# महाराष्ट्र शासन
# सार्वजनिक आरोग्य विभाग

---

## जिल्हा महिला व बाल रुग्णालय कुडाळ
## सन -२०२४-२०२५

**विषय -** ज़िल्हा महिला व बाल रुग्णालय कुडाळ करीता रुग्णालयीन स्वच्छता सेवा उपलब्ध करणे करीता

दरपत्रके मागविणे

१)जाहिर सूचना दि. २५/०७/२०२४

२)अंतिम दिनांक - ३१/०७/२०२४

३)दर पत्रके उघडणेचा दि.०१/०८/२०२४

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ जि सिंधुदूर्ग

| | |
|---|---|
| बेटी बचाव, बेटी पढाव | वैद्यकिय अधिक्षक, जिल्हा महिला व बाल रुग्णालय, कुडाळ तहसिलदार कार्यालय समोर जिल्हा-सिधुदूर्ग पिन कोड नं. ४१६ ५२० |
| वैद्यकिय अधिक्षक (वै) कार्यालय दूरध्वनीक्र. - ०२३६२/२९५६९७ | ई-मेल - dwchsindhudurg@gmail.com |


जा.क्रं.जिमबालरुकु/कं सेवा/स्वच्छता सेवा/ 1249 /२०२४ दिनांकः- २५ /०७ /२०२४

# जाहिर सूचना

जिल्हा महिला व बाल रुग्णालय कुडाळ येथील रुग्णालयीन विभागातील व रुग्णालयीन परीसर दैनंदिन साफसफाई करणेकरीता कंत्राटी पध्दतीने स्वच्छतासेवा पुरविणेची आहे.ईच्छुक पुरवठाधारकांनी सदर स्वच्छतासेवे करीता सिलबंद लखोटयामधुन दरपत्रक त्यांचे व्यवसायाचे पत्रावर सही करुन दिलेल्या तारखेस व वेळेत खालील विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार सादर करावे.'

## - दरपत्रकाच्या अटी व शर्ती -

| | | |
|---|---|---|
| १ | **कामाचे नाव** | जिल्हा महिला व बाल रुग्णालय कुडाळ मुख्य इमारत व परीसरातील स्वच्छता करणे |
| २ | **दरपत्रक भरणेसाठी पात्रता** | १)सुशिक्षीत बेरोजगारांची कार्यरत सेवा सोसायटी संस्था/तत्सम प्रकारची नोंदणीकृत संस्था.<br>२)बेरोजगार सहकारी संस्था.<br>३)शासकिय निमशासकिय कार्यालयास आऊटसोर्सिंग व्दारा स्वच्छता सेवा पुरविलेले अनुभवि कंत्राटदार.<br>४)पॅन कार्ड,जिएसटी नोंदणी प्रमाणपत्र,उद्योग आधार नोंदणी प्रमाणपत्र व भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र मागील सहा महिने निधी भरल्याची रिसीट ची प्रत |
| ३ | **कामचा कालावधी व अंदाजे रक्कम** | ५ महिने किंवा राज्सस्तरावरुन ई निवीदा कार्यवाही होईपर्यंत. अंदाजित मनुष्यबळावरील खर्च + साहित्यावरील खर्च दरमहा ४५००० सर्व करा सहित |
| ४ | **दरपत्रकासोबत आवश्यक कागदपत्रे** | १)बेरोजगार व मंजुर संस्था असलेस संस्था नोंदणी अधिनियमाप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र.<br>२)सर्वासाठी पॅनकार्ड आवश्यक (संस्थेचे नावे)<br>३)राष्ट्रीयकृत अथवा शेडयल बॅकेमध्ये खाते<br>४)जीएसटी नोदणी प्रमाणपत्र<br>५)व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र |
| ५ | **दरपत्रक सादर करणेचे ठीकाण व दरपत्रक उघडणेचे ठीकाण** | वैद्यकिय अधिक्षक जिल्हा महिला व बाल रुग्णालय कुडाळ यांचे कार्यालय |
| ६ | **दर पत्रक सादर करणेची अंतीम दिनांक व वेळ** | दिनांक ३१ /०७/२०२४ ,सायंकाळी १६.०० पर्यत |

| | | |
|---|---|---|
| ७ | **दरपत्रक उघडणेचा अंतीम दिनांक** | दिनांक ०१/०८/२०२४,सकाळी ११.०० वाजता<br>दरपत्रक उघडणारे व्यक्ती,संस्था यांनी सदर वेळी उपस्थित राहावे.ते उपस्थित न राहील्यास ३ सदस्यीय समितीसमोर उघडणेत येतील. |
| ८ | **दरपत्रकाचे अधिकार :** | वैद्यकिय अधिक्षक जिल्हा महिला व बाल रुग्णालय कुडाळ |

**कामाचे नाव – जिल्हा महिला व बाल रुग्णालय कुडाळ येथिल रुग्णालयीन ईमारत व परीसर यांची स्वच्छता करणे**

## (२) कामाची माहिती

| | | |
|---|---|---|
| १ | मोकळे क्षेत्र | जिल्हा महिला व बाल रुग्णालय कुडाळ मुख्य इमारती व परीसरातील सर्व रस्ते,इमारतीजवळील पेव्हर ब्लॉक बसविलेल्या जागा वाहनतळ,दोन इमारतीमधील व-हाडा,मोकळी जागा,इमारत नसलेली मोकळी जागा. |
| २ | दैनंदिन कामाचे स्वरुप व व्याप्ती | १)दररोज रुग्णालय आवारातील सर्व इमारतीजवळील जागेतील कचरा उचलणे व त्याची विहित पध्दतीने विल्हेवाट लावणे,गटारे ,रस्ते ,पेव्हर ब्लॉक,मोकळी जागा यावर केरसुणी वापरुन कचरा. ,धुळ काढणे,स्वच्छता करणे.<br>वेळ:- सकाळी ७.३० ते सकाळी ११.३०<br>दुपारी ३.३० ते सायं.७.३० |
| ३ | आठवडयातील १ दिवस कामकाजाचे स्वरुप व व्याप्ती | १)दर सोमवार रुग्णालय आवारातील पूर्व,पश्चिम,उत्तर व दक्षिण चारही दिशाकडील रुग्णालय आवारातील सर्व खुरटी झाडेझुडपे, रानगवत,पडलेली झाडे उचलणे व त्याची विहित पध्दतीने विल्हेवाट लावणे |
| ४ | आवश्यक मनुष्यबळ व साहित्य | ३ कामगार<br>कंत्राटदाराने खालील स्वतःचे साहित्य कामगारांना पुरविण्याचे आहे.<br>१)नारळाच्या हिराची केरसुणी<br>२)फावडे<br>३)घमेली<br>४)कुदळ,कोयता,खुंरपे<br>५)लांब दांडीच्या केरसुणी<br>६)कामगारांना हातमोजे ,बुट,टोपी संरक्षक गणवेष<br>७)काळे पांढरे फिनेल |

## कामाच्या अटी व शर्ती

१) दैनंदिन स्वच्छता ही दररोज दिलेल्या वेळेत करावी लागेल
२) मोकळे क्षेत्र व कामाचे गरजेनुसार कंत्राटदाराने कामगार ठेवणेचे आहेत
३) दैनंदिन बाहय क्षेत्राच्या स्वच्छता सेवेचे संनियंत्रण नियुक्त समितीकडुन होईल.सदर समिती अपला दैनंदिन अहवाल नोंदवहितील व महीन्याच्या शेवटचे तारखेस कार्यालयास सादर करतील.
४) स्वच्छतासेवा असमाधानकारक असेलेस एकुण देयकातील ०.५ टक्के एवढी रक्कम दंडनिय म्हणून वसुल केली जाईल.

Dist. Women & Child Hospital
सत्यमेव जयते
Sindhudurg - Kudal.

Medical Superintendent Cl
District Women & Child Hospital
Sindhudurg

वैद्यकिय अधिक्षक
जिल्हा महिला व बाल रुग्णालय कुडाळ

# स्वघोषणापत्र

१) मी/ आम्ही असे जाहिर करतो की, या दरपत्रकामध्ये किमान मुल्यापेक्षा अधिक दर नमुद केलेले नाहीत. अथवा बाजारभावापेक्षा अधिक दर नमुद केलेले नाहीत. या दरपत्रकात नमुद करणेत आलेली उत्पादक कंपनी किंवा माझा व्यवसाय काळया यादीतील नाही. मी किंवा माझे व्यवसायातील नोकर वर्ग यांचा जिल्हा शल्य चिकित्सक, सिंधुदूर्ग किंवा त्यांचे अधिपत्याखालील संस्था या मध्ये कोणतेही नाते व हितसंबंध नाहीत.

२) मी/ आम्ही असे जाहिर करतो की, माझे / आमचे व्यवसायाचे जीएसटी-वस्तु व सेवाकर याची नोंदणी झालेली असून वार्षिक आर्थिक उलाढाल रु २०.०० लक्ष पेक्षा अधिक असलेने जीएसटी - वस्तु व सेवाकर परतावा नियमित भरणेत येतो.

३) मी/ आम्ही असे जाहिर करता की, माझे/ आमचे व्यवसायाचे वार्षिक आर्थिक उलाढाल रु. २०.०० लक्ष पेक्षा कमी असलेने जीएसटी - वस्तु व सेवाकर या बाबतची नोंदणी केलेली नाही.

(२) व (३) पैकी जे आवश्यक आहे हे ठेऊन इतर खोडावे.

स्थळ :-

दिनांक :-

नाव व सही,रबरी शिक्का